अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । मंगळवार
१३.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २५४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### माटुंगा रेल्वेच्या २२ एकर जागेवर धारावी पुनर्वसन घरांचे भूमिपूजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडचे (एईएल) संचालक प्रणव अदानी यांच्या हस्ते सोमवारी माटुंगा येथील रेल्वेच्या २२ एकर जागेवर भूमिपूजन पार पडले. या निमित्ताने १० लाखांहून अधिक रहिवाशांचे वास्तव्य असलेल्या धारावीतील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाला सुरुवात झाली. अदानी नवभारत डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (एएनडीपीएल) मूळ जागी पुनर्वसन योजनेअंतर्गत पात्र रहिवाशांना ३५० चौरस फुटांची घरे उपलब्ध करून देईल. माटुंगा येथे आम्ही १० इमारतींमध्ये १०,४३२ घरे आणि १,३७९ व्यावसायिक व औद्योगिक गाळे उभारत आहोत.

## कचऱ्यापासून 'कॉम्प्रेस्ड बायोगॅस' निर्मितीसाठी टास्क फोर्स स्थापन करा! : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील शहरांना कचरामुक्त करण्यासोबतच कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) निर्मितीला चालना देण्यासाठी प्रकल्प उभारणीसंदर्भात टास्क फोर्स स्थापन करण्यात यावेत. ज्या ठिकाणी शक्य आहे, तेथे राज्याच्या सीबीजी धोरणानुसार प्रकल्प उभारावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी कचरामुक्त शहरे आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) प्रकल्पांबाबत आयोजित बैठकीत प्रस्तावित प्रकल्पांचा आढावा घेतला. यावेळी राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज आदी यावेळी उपस्थित होते. केवा ग्रीनच्या कार्यकारी संचालक वृंदा ठाकूर, व्यवस्थापकीय संचालक केदार वझे, संचालक नंदन वझे यांनी केवा ग्रीनच्या वतीने




नागपूरमध्ये राबविण्यात आलेल्या कचऱ्यापासून बायोगॅस प्रकल्पाचे सादरीकरण केले व राज्यात अशा प्रकारे प्रकल्प उभारण्यासंदर्भात माहिती दिली.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कचऱ्याचे प्रमाण, उपलब्ध जागा, तंत्रज्ञानाची उपयुक्तता आणि गॅस पाइपलाइनचे अंतर या बाबी विचारात घेऊन प्रकल्पांचे नियोजन करण्याची गरज असून, या क्षेत्रातील कंपन्या, तेल कंपन्या आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सहभागातून अंमलबजावणीची प्रक्रिया निश्चित करावी. या प्रकल्पांमुळे कचरा उचलण्यासाठी महापालिकांना करावा लागणारा खर्च वाचणार असून, कचरामुक्त शहरांच्या उद्दिष्टाला चालना मिळेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. त्यामुळे मुंबई महापालिका, वसई-विरार, मीरा भाईंदर, कल्याण डोंबिवली त्याचप्रमाणे पुण्यातील हिंजवडी व चाकण परिसरात अशा प्रकारे प्रकल्प उभारण्यासंदर्भात विचार करावा. कचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन, उपलब्ध तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि प्रकल्पांसाठी आवश्यक जागेचे नियोजन या बाबींना प्राधान्य देऊन राज्यातील शहरांना कचरामुक्त करण्याच्या दिशेने ठोस पावले उचलण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

## ग्राम वाघोलीतील जुगारावर पोलिसांचा छापा

(अंबादास सिनकर)

**मोर्शी** – अमरावती ग्रामीण पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली माहुली जहागीर पोलिसांनी ग्राम वाघोली परिसरातील पारधी बेड्याजवळ सुरू असलेल्या जुगारावर छापा टाकून एकूण ५ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनुसार, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी माहुली जहागीर पोलीस ठाण्याचे पथक दुर्गा उत्सवाचे बंदोबस्ताकरिता गस्तीवर असताना गोपनीय माहितीच्या आधारे वाघोली येथील पारधी बेड्याजवळ काही इसम सार्वजनिक इलेक्ट्रिक पोलचे उजेडाखाली ताश पत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळत असल्याचे आढळून आले.

**५ लाख ६३ हजारांचा मुद्देमाल जप्त** | **पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल** | **माहुली जहागीर पोलिसांची कारवाई**



पोलिसांनी पंचांच्या मदतीने छापा टाकून जुगार खेळणाऱ्यांना ताब्यात घेतले.

या कारवाईत जुगाराची रोख रक्कम ३ हजार ९०० रुपये, पाच मोटारसायकली अंदाजे किंमत ४ लाख ३५ हजार रुपये, दोन अँड्रॉइड मोबाईल फोन किंमत २५ हजार रुपये आणि ५२ ताशपत्ते असा एकूण ५ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी शुभम घाडगे भोसले (वय २१, रा. केकतपूर), संजय भोसले (वय २८, रा. सारवाडी, ता. आर्वी, जि. वर्धा), दीपक विजयसिंग जाधव (वय ५०, रा. सालोरा) आणि सूरज कवडदास भोसले (वय २७, रा. केकतपूर) यांच्यासह पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली माहुली जहागीरचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पोलीस पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## शासनानं तब्बल ९६ हजार कोटी थकवले

*** दहा महिन्यात नऊ कंत्राटदारांनी आयुष्य संपवलं : आता राज्य कंत्राटदार महासंघाचा एल्गार, राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयांवर धडकणार**




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – गेल्या तीन वर्षापासून राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जल जीवन मिशन अशा विभागातील शासकीय कंत्राटदारांची जवळपास ९६ हजार कोटी रुपयांची रक्कम थकीत असून यामुळे राज्यातील गेल्या दहा महिन्यात नऊ कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचा दावा करत राज्यकंत्राटदार संघटनांनी आता सरकारविरोधात एल्गार पुकारला आहे.

येत्या दसऱ्याच्या पूर्वसंध्येला राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर कंत्राटदार संघटना निदर्शने व आंदोलन करणार असल्याची माहिती आहे. सरकारने तात्काळ कंत्राटदारांची देयके देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी राज्यकंत्राटदार संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी केली आहे. असं न झाल्यास राज्यभरातील कंत्राटदार रस्त्यावर उतरतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पत्रव्यवहार; पण भेटीसाठी सुद्धा वेळ दिली जातं नाहीयेबजेटच्या चारपट काम सरकारने मंजूर केली होती, त्यानंतर कंत्राटदारांनी ही काम केली.

२०२३ पासून विविध विभागाच्या ८६ हजार कोटी रुपयांचे देयके प्रलंबित आहेत. या संदर्भात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना आम्ही पत्रव्यवहार करतोय. पण भेटीसाठी सुद्धा वेळ दिली जातं नाही. २०२२ ते २०२५ च्या काळात बजेटच्या चारपट काम शासनाने मंजूर केली. आमच्यामागे लागून कामही करून घेण्यात आली, आता पैसे देत नाहीत. अजित पवार अर्थमंत्री असताना काही मार्ग काढण्याचा प्रयत्न झाला, पण आता बैठकही घेतली जातं नाही. काय राजकारण सुरू आहे, याच्याशी आम्हाला काहीही देणेघेणे नाही. निवडणूक आधीच ही कामं मंजूर झाली आणि वर्कऑर्डर झाली, शासनाने कामांचा दिखावा केला. ज्याचा फटका कंत्राटदारांना बसतोय अशी प्रतिक्रिया राज्य कंत्राटदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिली आहे.

देश स्वतंत्र झाल्यापासून पहिल्यांदाच अशी वेळ, आम्ही जगायचं कसं? दरम्यान, येत्या १९ ऑक्टोबर रोजी आम्ही राज्यतील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर आंदोलन करतोय. देश स्वतंत्र झाल्यापासून पहिल्यांदाच अशी वेळ आली आहे. वर्षातून ४ वेळा बिलं निघत होते, आता एकदाही बिलं नाहीत. सरकारने आता या हत्या थांबवाव्या अशी आम्ही मागणी करतोय. तर सरकारकडे आता पैसाच नाही, त्यामुळे आम्हाला भेटायला ही तयार नाही. कंत्राटदार आता जेरीला आलेत, ज्यांच्याकडून माल घेतला त्यांचे फोन येतात, कर्मचाऱ्यांचे पैसे देणे थकलेत. त्यामुळे आम्ही जगायचं कसं? हा मोठा प्रश्न यामुळे उभा राहिला आहे. अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

**मोर्शी पोलिसांची अवैध गोवंश वाहतुकीवर पुन्हा धडक कारवाई!**

## मालवाहू वाहनासह दोन गोवंश जप्त : २ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध मोर्शी पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत दोन गोवंश जनावरांसह वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे मालवाहू वाहन असा एकूण २ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १० ऑक्टोबर रोजी करण्यात आली.

अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध




धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण हे पथकासह पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहितीच्या आधारे वरूड-मोर्शी मार्गावर गोवंश जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याचे समजले.

या माहितीवरून मोर्शी येथील पोस्टेफ सापळा पॉइंटवर नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू असताना वरूड रोडकडून मोर्शीच्या दिशेने एक मालवाहू वाहन येताना दिसले. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये दोन गोवंश जनावरे आढळून आली. वाहनचालकाचे नाव विचारले असता त्याने शेख अन्वेश शेख निजाम (वय २३, रा. वनारसी ता. जि. अमरावती) असे सांगितले.

पोलिसांनी टाटा एस एचटी बीएस-३ (क्रमांक चक-०२-उए-३८५२) हे अंदाजे २ लाख ५० हजार रुपये किमतीचे वाहन आणि दोन गोवंश जनावरे, ज्यांची अंदाजे किंमत ३३ हजार रुपये आहे, असा एकूण २ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम तसेच महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. अशा घटना मोर्शीत वारंवार होत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील आणि पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कार आणि अथर्व कोहळे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.



जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा वाढवा!

# विविध मागण्यांसाठी मोर्शी काँग्रेसचे १५ ऑक्टोबरला धरणे आंदोलन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था दूर करून शैक्षणिक दर्जा उंचावणे, शालेय व्यवस्थापनात पारदर्शकता आणणे आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या मोर्शी तालुका कमेटीच्या वतीने शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती नुकत्याच शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अमरावती यांना सादर करण्यात आल्या. मागण्यांची पूर्तता न झाल्यास १५ ऑक्टोबर २०२६ रोजी शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

अमरावती जिल्हातील जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था लक्षात घेता, त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, सर्व शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी प्रभावी नियोजन करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच कोणतीही जिल्हा परिषद शाळा बंद न करता 'गाव तिथे शाळा' हे धोरण राबविण्यात यावे, शिक्षकांची भरती कंत्राटी मानधन तत्त्वावर न करता कायमस्वरूपी करण्यात यावी आणि शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय विविध ऑनलाइन कामांचे एकत्रीकरण करून प्रशासकीय कामकाज सुलभ करावे, संचमान्यतेसंदर्भातील १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करावा, संविधानातील तरतुदींनुसार १४ वर्षांपर्यंतच्या प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे शिक्षण मिळेल याची खात्री करावी, जिल्हा परिषद शाळांमध्ये सेमी इंग्रजी पॅटर्न सुरू करावा, अंगणवाडी केंद्रांत केजी-१ व केजी-२ चे शिक्षण उपलब्ध करून द्यावे आणि शाळांमध्ये कौशल्यविकासाधारित शिक्षणपद्धती राबवावी, अशा मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.

या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १५ ऑक्टोबर रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अमरावती यांच्या कार्यालयासमोर काँग्रेस पक्षाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी सेलचे सचिव विपुल भडांगे, मोर्शी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा नगरसेवक भूषण कोकाटे, माजी जिल्हा परिषद सदस्य मुरलीनाना डहाणे, सेवादल अध्यक्ष निलेश तट्टे, ॲड. रेश्मा डहाणे, चंद्रशेखर तराटे, विलास टिकले, विलास पवार, प्रकाश काळे यांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.



**वरुड :** जायंट्स ग्रुप ऑफ वरुडचे माजी अध्यक्ष तथा न.प.स्विकृत सदस्य संजय उर्फ योगेश्वर खासबागे यांना वाढदिवस निमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना हरीसेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन खेरडे, माजी अध्यक्ष उमेश कांडलकर, महेश बोरकुटे, सचिन परिहार, महेंद्र हरले तथा श्री.पंचभाई.

जनता हायस्कूलमध्ये

# घटस्थापनेच्या दिवशी शारदा देवीची स्थापना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – राणी लक्ष्मीबाई महिला मंडळ शेंदुरजनाघाट शारदोत्सव २०२६ ची सुरुवात पूर्व प्रथेनुसार ११ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर सांस्कृतिक सभागृह जनता हायस्कूल येथे घटस्थापनेच्या दिवशी १६ ऑक्टोबरला शारदा देवीची स्थापना नगरपरिषद शेंदुरजनाघाट महिला बालकल्याण उपसभापती माधुरी माहुरे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी राणी लक्ष्मीबाई महिला मंडळ अध्यक्ष संगीता बेले, उपाध्यक्ष सविता सावरकर, सचिव नीलिमा कुबडे, सहसचिव प्रीती नागपुरे, सदस्य पद्मा माळोदे, माधुरी माहुरे, नीलिमा खेरडे, अर्चना बेलसरे, संध्या सावरकर, नलिनी शिरभाते, मिकिता खंडेलवाल व मीनल गणोरकर यांच्यासह सर्व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तसेच ११ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर पर्यंत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून शारदोत्सव मोठा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

# जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये सुद्धा नेत्रदीपक कामगिरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धा ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान श्री.शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे पार पडल्या. या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये जनता हायस्कूल व श्री एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली.

१४ वर्षे वयोगटामध्ये सोहम पांडे ८० मीटर हर्डल्स प्रथम, १७ वर्षे वयोगटामध्ये युगल चापले भालाफेक प्रथम व हातोडा फेक तृतीय, अयानशहा हातोडा फेक प्रथम, हर्षल दरवई १५०० मीटर व ३००० मीटर धावणे प्रथम, १९ वर्षे वयोगटामध्ये तनुज अकर्ते हातोडा फेक प्रथम, कृष्णाली गणोरकर भालाफेक द्वितीय असे क्रमांक प्राप्त केले व विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. वरील सर्व विजयी खेळाडूंना ज्येष्ठ क्रीडाशिक्षक योगेश सावरकर, प्रविण गणोरकर, योगेश अकर्ते यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. वरील सर्व विजयी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक क्रीडाशिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

जनता शिक्षण संस्थाध्यक्ष जगदीश काळे, उपाध्यक्ष अरुण काळे, सतिश सोलव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, ज्येष्ठ संचालक राजेंद्र बेलसरे, अरुण फुटाणे, ॲड.प्रभाकर सावरकर, प्राचार्य मनोहर गणोरकर, पर्यवेक्षक उमेश काळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले तसेच पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा दिल्या.

स्व.सरस्वताबाई पं.ठाकरे विद्यालयाची

# तन्वी युवनाते क्रिडा स्पर्धेत जिल्हयातून व्दितीय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – हातुर्णा येथील स्व.सरस्वताबाई पं.ठाकरे विद्यालयाची वर्ग ९ ची विद्यार्थीनी तन्वी चंद्रशेखर युवनाते हिने ३००० मीटर धावणे स्पर्धेमध्ये जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक प्राप्त करून यवतमाळ येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धे करिता पात्र ठरली आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धा नुकतीच शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे पार पडल्या. त्या स्पर्धेमध्ये धनश्री धुर्वे १५०० मीटर धावणे, गौरी बोरकर ३००० मीटर चालणे व तन्वी युवनाते३००० मीटर धावणे मध्ये सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये तन्वी युवनाते ही विभागीय स्तराकरीता पात्र ठरली आहे.

तन्वी तिच्या यशाचे श्रेय शारीरिक शिक्षिका सुनीता ढोले यांना देते. तिच्या यशाबद्दल संस्थेच्या सहसचिव डॉ.प्राची ठाकरे, मुख्याध्यापक महेंद्र खापरे, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी तिच्या अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

आर.जी.देशमुख कृषी विद्यालयाच्या

# प्रविण व संदीप या विद्यार्थ्यांचे क्रिडा स्पर्धेत यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**चांदस वाठोडा** – जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये वाठोडा येथील आर.जी.देशमुख कृषी विद्यालयाचे प्रवीण देशमुख व संदीप धुर्वे या विद्यार्थ्यांची निवड विभागीय स्तरावर झाली.

अमरावती येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये वाठोडा चांदस येथील आर जी देशमुख कृषी विद्यालयाचा संदीप धुर्वे या विद्यार्थ्याचा ४०० मीटर हरडल्स स्पर्धेमध्ये प्रथम तर याच स्पर्धेमध्ये प्रवीण देशमुख या विद्यार्थ्यांचा द्वितीय क्रमांक आला असुन या दोन्ही विद्यार्थ्यांची निवड विभागीय स्पर्धेकरीता झालेली आहे.

घरची गरिबीची परिस्थिती असून सुद्धा त्यावर मात करून ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल परिसरात सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होतो आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शारीरिक शिक्षक पी.एम.भुजाडे, सहा.शिक्षक अभिजीत देशमुख, राहुल देशमुख यांचे सुद्धा सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दोन्ही विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष अनिलकुमार देशमुख, सचिव अश्विनकुमार देशमुख, उपाध्यक्ष देवेंद्र बोडखे, सदस्य गिरीश देशमुख, प्राचार्य अजय देशपांडे व सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत हरीसेवा फाऊंडेशनच्या सौजन्याने

# वन्यजीव सप्ताह निमित्ताने 'निबंध स्पर्धा' उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)






**वरुड** – जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा करजगाव (गांधीघर) येथे हरीसेवा फाऊंडेशन वरूड यांच्या सौजन्याने 'वन्यजीव सप्ताह' आणि त्यानिमित्ताने 'निबंध स्पर्धा' आयोजित करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान 'वन्यजीव सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वन्यप्राण्यांचे रक्षण, जंगलांचे संवर्धन आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड व जाणीव निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी संवेदनशील विचार रुजावेत म्हणुन 'निबंध स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेसाठी पहिली ते चौथी करीता गट अ करीता 'माझा आवडता वन्यप्राणी' व 'जंगल आणि आपण', पाचवी ते सातवी करीता गट ब 'पर्यावरण संतुलन आणि वन्यजीव संरक्षण' व 'जर जंगल नष्ट झाले तर...?' हे विषय ठेवण्यात आले आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या स्पर्धेत सहभाग घेतला व आपले विचार निबंधातून मांडले. निबंध स्पर्धेत उत्कृष्ट लेखन करणाऱ्या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणपत्रक व निसर्गाशी संबंधित पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले.

प्राण्यांशिवाय जंगल आणि जंगलांशिवाय माणसाचे अस्तित्व अशक्य आहे हे प्रा.संजय सातपुते यांनी स्पष्ट केले. केवळ पुस्तकी ज्ञान न ठेवता झाडे लावणे आणि वन्यप्राण्यांच्या अधिवासाला इजा न पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे, असा संकल्प घेण्याचा आग्रह विवेक बुरे यांनी केला.

टाकाऊ पदार्थ आणि इतर साहित्यापासून पक्षांकरिता घरटे कसे बनवायचे याचे प्रात्यक्षिक रामभाऊ राऊत यांनी दाखविले. पुढील पिढीचे नागरिक आणि पर्यावरण सैनिक म्हणून विद्यार्थ्यांना रास्त भुमिका पार पाडण्याचे आवाहन हरी-सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन खेरडे यांनी केले. याप्रसंगी हरीसेवा फाऊंडेशनचे माजी अध्यक्ष उमेश कांडलकर सुध्दा उपस्थित होते.

यावेळी हरीसेवा फाऊंडेशन तर्फे महेश बोरकुटे यांनी विद्यार्थ्यांना शेंगदाणे, गुळाची चिक्की वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा करजगाव (गांधीघर) येथील मुख्याध्यापक प्रमोद जावळे, सहायक शिक्षक गोपाल गुल्हाने, राजेंद्र बहुरुपी, सुरेखा पोकळे, संगिता बरवड उपस्थित होते.

# संपादकीय

**आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा.**

## ट्रम्प यांच्या अटी आणि भारतीयांपुढील आव्हाने!

अमेरिकेच्या कठोर धोरणांचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर, व्यापारावर आणि भारतीयांच्या स्वप्नांवर होणारा परिणाम अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू म्हणजे 'अमेरिका फर्स्ट'. अमेरिकेचे आर्थिक हित, देशांतर्गत रोजगार आणि व्यापारी वर्चस्व यांना सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या या धोरणाचा परिणाम केवळ अमेरिकेपुरता मर्यादित राहत नाही, तर भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांवरही होतो. व्यापारावरील निर्बंध, आयात शुल्क, व्हिसासंबंधी कठोर भूमिका आणि स्थलांतराच्या नियमांमधील बदल यांमुळे भारतीयांसमोर नवी आव्हाने निर्माण होऊ शकतात. त्यामुळे ट्रम्प यांच्या अटींकडे केवळ अमेरिकेचा अंतर्गत राजकीय निर्णय म्हणून नव्हे, तर भारताच्या आर्थिक आणि सामरिक हिताच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

भारत आणि अमेरिका हे दोन्ही देश लोकशाही मूल्ये, तंत्रज्ञान, संरक्षण, शिक्षण आणि व्यापार अशा अनेक क्षेत्रांत सहकार्य करतात. अमेरिकेत भारतीय वंशाचे नागरिक मोठ्या संख्येने स्थायिक झाले आहेत. माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवा, संशोधन, अभियांत्रिकी आणि उद्योजकता या क्षेत्रांत भारतीयांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. हजारो भारतीय विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेची निवड करतात. अशा परिस्थितीत अमेरिकेच्या धोरणांमध्ये होणारा कोणताही मोठा बदल भारतीयांच्या रोजगाराच्या संधींवर, शिक्षणाच्या खर्चावर आणि भविष्यातील योजनांवर परिणाम करू शकतो.

**व्यापारयुद्धाचा फटका कोणाला?**

ट्रम्प प्रशासनाने व्यापारात अमेरिकेच्या हिताला प्राधान्य देण्याची भूमिका घेतल्यास आयात शुल्क हा महत्त्वाचा मुद्दा ठरतो. भारतातून अमेरिकेत औषधे, वस्त्रोद्योगातील उत्पादने, अभियांत्रिकी वस्तू, रत्ने-दागिने आणि विविध औद्योगिक उत्पादने निर्यात केली जातात. या उत्पादनांवर शुल्क वाढल्यास भारतीय वस्तूंच्या किमती अमेरिकेच्या बाजारपेठेत वाढू शकतात. परिणामी भारतीय निर्यातदारांना स्पर्धेत टिकून राहण्यासाठी किमती कमी कराव्या लागू शकतात किंवा पर्यायी बाजारपेठा शोधाव्या लागू शकतात.

याचा परिणाम विशेषतः लघुउद्योग, मध्यम उद्योग आणि निर्यातदारांवर होण्याची शक्यता असते. उत्पादन घटले, ऑर्डर कमी झाल्या किंवा नफ्याचे प्रमाण घसरले, तर रोजगारनिर्मितीवरही दबाव येऊ शकतो. मात्र, व्यापार शुल्काचा नेमका परिणाम कोणत्या वस्तूंवर किती शुल्क लागू आहे, त्यांना कोणत्या सवलती आहेत आणि दोन्ही देशांमध्ये कोणत्या प्रकारचे व्यापार करार होतात, यावर अवलंबून असतो.

# आजचे राशी भविष्य

मंगळवार, दि. 13 ऑक्टोबर 2026

**मेष** (21 मार्च – 19 एप्रिल)
कामाच्या ठिकाणी नवीन जबाबदाऱ्या मिळु शकतात. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कुटुंबासोबतचा वेळ आनंददायी ठरेल. आरोगयाकडे लक्ष द्या.
शुभ रंग : लाल | शुभ अंक : 9

**वृषभ** (20 एप्रिल – 20 मे)
आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगा. नवीन गुंतवणुकीसाठी दिवस अनुकुल. कुटुंबातील एखादा शुभ प्रसंगांची चर्चा होऊ शकते. संयम ठेवा.
शुभ रंग : हिरवा | शुभ अंक : 6

**मिथुन** (21 मे – 20 जून)
कामात यश मिळेल. मित्रपरिवाराकडून मदत मिळण्यांची शक्यता. प्रवासांचे योग आहेत. मनातील गोंधळ कमी होईल आणि निर्णय घेण्यांची क्षमता वाढेल.
शुभ रंग : पिवळा | शुभ अंक : 5

**कर्क** (21 जून – 22 जुलै)
कुटुंबातील वातावमम आनंदी राहील. जुने मतभेद दुर होण्यांची शक्यता. नोकरीत प्रगतीचे संकेत. आरोग्याच्या बाबतीत काळजी घेणे आवश्यक.
शुभ रंग : पांढरा | शुभ अंक : 2

**सिंह** (23 जुलै – 22 ऑगस्ट)
आजचा दिवस आत्मविश्वास वाढवणारा ठरेल. महत्त्वांचे निर्णय शकारान्मक ठरतील. नोकरी-व्यवसायात चांगले परिणाम मिळतील. मान-सन्मान वाढेल.
शुभ रंग : केशरी | शुभ अंक : 1

**कन्या** (23 ऑगस्ट – 22 सप्टेंबर)
कामातील नियोजन सफल होईल. आर्थिक लाभांचे संकेत आहेत. घरातील जबाबदाऱ्या वाढु शकतात, पण त्या यशस्वीपणे पार पाडाल.
शुभ रंग : हिरवा | शुभ अंक : 5

**तुला** (23 सप्टेंबर – 22 ऑक्टोबर)
नवीन संधीचे दरवाजे खुलतील. भागीदारीच्या कामात फायदा होईल. प्रेम व वैवाहिक जीवनात समजुतदारपणा राखावा. खर्चावार नियंत्रण ठेवा.
शुभ रंग : निळा | शुभ अंक : 6

**वृश्चिक** (23 ऑक्टोबर – 21 नोव्हेंबर)
कामात मेहनतीचे फळ मिळेल. आर्थिक स्थिती मधबुत होईल. जमीन-जुमला किंवा मालमत्ते संबंधीय कामे पूर्ण होण्यांची शक्यता.
शुभ रंग : जांभळा | शुभ अंक : 9

**धनु** (22 नोव्हेंबर – 21 डिसेंबर)
प्रवासांचे योग आहेत. नवीन लोकांशी ओळखी वाढतील. शिक्षण व स्पर्धा परीक्षांसाठी दिवस अनूकुल. कामात सकारात्मक बदल होऊ शकतात.
शुभ रंग : पिवळा | शुभ अंक : 3

**मकर** (22 डिसेंबर – 19 जानेवारी)
कामात स्थैर्य येईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक बाबतीत लाभ संभवतो. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील परंतु त्या निभावता.
शुभ रंग : तपकिरी | शुभ अंक : 8

**कुंभ** (20 जानेवारी – 18 फेब्रुवारी)
नवीन उपक्रमासाठी दिवस चांगला. मित्रांचे सहकार्य लाभेल. मानसिक तणाव कमी होईल. आरोग्यात सुधारणा होईल. आर्थिक नियोजन करा.
शुभ रंग : निळा | शुभ अंक : 4

**मीन** (19 फेब्रुवारी – 20 मार्च)
धार्मिक कार्यात मन रमेल. कुटुंबासोबत आनंदांचे क्षण मिळतील. नवीन कामाची सुरुवात होऊ शकते. स्वतःच्या आरोग्याकडे विशेम लक्ष द्या.
शुभ रंग : गुलाबी | शुभ अंक : 7

# पशुधनासाठी चारा टंचाईवर उपाययोजना

**भारत हा कृषिप्रधान देश असून शेती आणि पशुपालन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. गाय, म्हैस, शेळी, मेंढी यासारख्या पशुधनापासून दूध, मांस, शेणखत आणि इतर उपयुक्त उत्पादने मिळतात. ग्रामीण भागातील लाखो शेतकरी व पशुपालकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन पशुपालन आहे. मात्र, वाढती लोकसंख्या, शेतीयोग्य जमिनीवरील वाढता ताण, अनियमित पाऊस, दुष्काळ, हवामान बदल, पाण्याची कमतरता आणि चाऱ्याचे अपुरे नियोजन यांमुळे पशुधनासाठी चारा टंचाई ही गंभीर समस्या बनत आहे.**



चारा टंचाईचा परिणाम केवळ जनावरांच्या भुकेपुरता मर्यादित नसून त्याचा थेट परिणाम दूध उत्पादन, प्रजनन क्षमता, जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती, शरीरवाढ आणि पशुपालकांच्या आर्थिक उत्पन्नावर होतो. त्यामुळे चारा टंचाईवर मात करण्यासाठी तात्पुरत्या उपायांसोबतच दीर्घकालीन, शास्त्रीय आणि शाश्वत उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**आरोग्य आणि गोठ्याचे व्यवस्थापन**

**उष्णतेपासून संरक्षण**

उन्हाळ्याच्या तीव्रतेपासून वाचवण्यासाठी गोठ्याच्या छतावर गवत किंवा पाचट टाकावे. गोठयाभोवती सावली देणारी झाडे लावावीत आणि शक्य असल्यास दुपारच्या वेळी गोणपाट ओले करुन टाकावे.

**लसीकरण आणि जंतनिर्मूलन**

दुष्काळात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते, त्यामुळे लाळ्याखुरकुत, घटसर्प यांसारख्या आजारांचे वेळेवर लसीकरण करावे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने जंतनिर्मुलन करावे.

**स्वच्छ पाणी उपलब्धता**

दुष्काळात जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ आणि मुबलक पाणी मिळेल याची व्यवस्था करावी. जनावराच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास ते आजारी पडू शकतात. पाण्याची उपलब्धता कमी असल्यास उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी साबली व पाणी व्यवस्थापन करणे. पाण्याचा अनावश्थक अपव्यय टाळणे.

**चाऱ्याचे योग्य नियोजन आणि साठवणूक**

उपलब्ध हिरवा आणि कोरडा चारा यांची स्वतंत्र नोंद ठेवावी. चाऱ्याचा अनावश्यक अपव्यय टाळावा.वासरे, गाभण जनावरे आणि जास्त दूध देणाऱ्या जनावरांना त्यांच्या गरजेनुसार प्राधान्य द्यावे. चारा कापून योग्य आकारात दिल्यास निवडून खाणे आणि जमिनीवर चारा सांडणे कमी होऊ शकते. आहारात बदल हळूहळू करावेत; अचानक मोठे बदल टाळावेत.

**हिरव्या चाऱ्याची निर्मिती**

सिंचन सुविधा उपलब्ध असल्यास जास्तीत जास्त हिरवा चारा निर्मिती करावी.

**मुरघास निर्मिती**

जेव्हा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध असतो, तेव्हाच मका किंवा ज्वारीपासून मुरघास बनवून ठेवावा. हा चारा दुष्काळात अत्यंत उपयुक्त ठरतो. मका, ज्वारी, बाजरी इत्यादींचे सायलेज तयार करावे. हवाबंद स्थितीत साठवुन दीर्घकाळ वापरता येते. दुष्काळात हिरवा चारा उपलब्ध नसताना सायलेज महत्त्वाचा पर्याय ठरतो.

**चाऱ्याची नासाडी रोखणे**

जनावरांना अखखा चारा न टाकता कुटी करुन (कडबा कुटी यंत्राच्या साहाय्याने) टाकावा. यामुळे चाऱ्याची १० ते १२ टक्के होणारी नासाडी वाचते. सुक्या चाऱ्यावर प्रक्रिया- उपलब्ध सुक्या चाऱ्याची (उदा. गव्हाचा कोंडा, पेंढा, वाळलेले गवत) पौष्टिकता वाढवण्यासाठी त्यावर युरिया-गुळ-मीठ प्रक्रियेचा वापर करावा.

अझोला आणि हायड्रोपोनिक चारा

अझोला आणि हायड्रोपोनिक चारा हे काही परिस्थितींमध्ये पूरक पर्याय ठरू शकतात

**अझोला :** योग्य पद्धतीने उत्पादित केल्यास काही पोषक घटकांचा पूरक स्रोत ठरू शकतो; मात्र तो एकटाच संपूर्ण पशुआहाराची जागा घेऊ शकत नाही.

**हायड्रोपोनिक चारा :** मातीशिवाय नियंत्रित परिस्थितीत उगवलेला चारा कमी जागेत तयार करता येतो. मात्र त्यासाठी बियाणे, पाणी, स्वच्छता, ऊर्जा आणि उत्पादन खर्च यांचा विचार करावा लागतो. अंकुरवाढी दरम्यान सुक्या बियाण्यांच्या तुलनेत प्रति किलो ताज्या चाऱ्यातील शुष्क पदार्थांचे प्रमाण कमी असू शकते. या पर्यायांचा वापर स्थानिक परिस्थिती, खर्च आणि पोषणमूल्यांचे मूल्यमापन करून करावा.

**जनावरांची संख्या व उत्पादकता व्यवस्थापन (दीर्घकाळ दुष्काळ असल्यास)**

अनुत्पादक व अतिवृद्ध जनावरांचे व्यवस्थापन. दुभत्या व गाभण जनावरांना प्राधान्य. वासरांचे स्वतंत्र पोषण. उपलब्ध संसाधनांनुसार पशुधनाची संख्या नियंत्रित ठेवणे.

**शासन आणि संस्थात्मक पातळीवरील उपाययोजना**

चारा टंचाईचे व्यवस्थापन प्रभावी करण्यासाठी शासन, पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे.

**प्रमुख उपाय**

**चारा टंचाईचे पूर्वनियोजन** : पर्जन्यमान, पीक उत्पादन, उपलब्ध चारा साठा आणि पशुधन संख्या यांचा आढावा घेऊन संभाव्य टंचाईचा अंदाज बांधणे, चारा बियाण्यांचे वितरण : स्थानिक हवामानाला अनुकूल आणि प्रमाणित चारा बियाणे उपलब्ध करुन देणे, चारा उत्पादन प्रात्यक्षिके: कृषी विज्ञान केंद्रे आणि संबंधित विभागांमार्फत शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, मुरघास युनिट्स : शेतकरी गट, दुग्ध सहकारी संस्था आणि उत्पादक संस्थांमार्फत सामुदायिक मुरघास निर्मितीला प्रोत्साहन देणे, चारा वाहतूक आणि वितरण : तीव्र टंचाईच्या काळात स्थानिक गरजांनुसार चारा पुरवठा आणि वाहतुकीचे नियोजन करणे, पशुआहार सल्ला : पशुवैद्यकीय अधिकारी आणि पशुपोषण तज्ज्ञांच्या मदतीने संतुलित आहाराबाबत मार्गदर्शन करणे, योजनांची माहिती : चारा उत्पादन, सिंचन, यांत्रिकीकरण आणि पशुपालनाशी संबंधित लागू योजनांची माहिती अधिकृत शासकीय यंत्रणेमार्फत देणे, विशिष्ट अनुदान, योजना आणि पात्रता या वेळोवेळी बदलू शकतात. त्यामुळे संबंधित जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभाग किंवा कृषी विभागाकडून अद्ययावत माहिती घ्यावी.

**महाराष्ट्रातील चारा टंचाईसाठी विशेष उपाययोजना**

महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पर्जन्यमान व पाण्याची उपलब्धता यांनुसार चारा टंचाईची तीव्रता बदलते. त्यामुळे प्रत्येक विभागासाठी स्थानिक परिस्थितीनुसार नियोजन आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

पशुधनासाठी चारा टंचाई ही केवळ शेती उत्पादनाशी संबंधित समस्या नसून ग्रामीण अर्थव्यवस्था, दुग्धव्यवसाय, पशू आरोग्य आणि अन्नसुरक्षेशी निगडित महत्त्वाची समस्या आहे. या समस्येवर मात करण्यासाठी चारा पिकांची शास्त्रीय लागवड, पीक अवशेषांचा योग्य वापर, मुरघास व हे निर्मिती, संतुलित पशुआहार, गायरानांचे संवर्धन, जलसंधारण आणि गावपातळीवरील चारा बँका या उपाययोजनांचा एकत्रित अवलंब करणे आवश्यक आहे. विशेषतः चारा मुबलक असलेल्या काळात त्याचे शास्त्रीय पद्धतीने संकलन व साठवणूक केल्यास उन्हाळा आणि दुष्काळाच्या काळातील संकट कमी करता येते. शासन, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, सहकारी संस्था आणि पशुपालक यांनी समन्वयाने काम केल्यास चारा टंचाईचे परिणाम कमी करणे शक्य आहे. आजचे चारा नियोजन, उद्याचे सक्षम पशुधन आणि समृद्ध पशुपालक!



डॉ.सुजाता भटकर
(७३५०४९२३४३)
पशुसूक्ष्मजीवशास्त्र तज्ञ

# महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट!

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह शेतीतून होतो. मात्र, पावसाच्या लहरीपणामुळे शेतीचे अर्थकारण वारंवार संकटात सापडत आहे. कधी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होते, तर कधी पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहतात. पावसाचे असमान वितरण, वाढते तापमान, घटणारी भूजलपातळी आणि पाण्याच्या नियोजनातील त्रुटी यांमुळे महाराष्ट्रासमोर दुष्काळाचे संकट अधिक गंभीर बनू शकते.

**पावसाची अनिश्चितता, पाण्याची टंचाई आणि शेतकऱ्यांच्या भविष्याचा प्रश्न**

दुष्काळ म्हणजे केवळ पावसाची कमतरता नव्हे, तर पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, शेतीचे उत्पादन, ग्रामीण रोजगार आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसणारा फटका होय. त्यामुळे दुष्काळाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहून चालणार नाही. त्यासाठी दीर्घकालीन नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि लोकसहभागाची आवश्यकता आहे.

**पावसाच्या लहरीपणाचा शेतीला फटका**

महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाच्या वितरणातील अनिश्चितता शेतीसमोर आव्हाने उभी करते. पावसाळ्याच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाला, तरी पुढील काळात पावसाने खंड दिल्यास पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. कापूस, सोयाबीन, तूर, ज्वारी आणि इतर खरीप पिकांसाठी योग्य वेळी पाऊस मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते.

पेरणी केल्यानंतर पावसाचा दीर्घ खंड पडला, तर शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढतो. दुबार पेरणीची वेळ आल्यास बियाणे, खते, मजुरी आणि मशागतीचा अतिरिक्त खर्च करावा लागतो. दुसरीकडे, पीक हातात येण्याची शक्यता कमी झाल्याने कर्जाची परतफेड, घरखर्च आणि मुलांचे शिक्षण यांसारख्या जबाबदाऱ्यांचा प्रश्न निर्माण होतो.

विशेषतः कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडे सिंचनाचे पर्यायी साधन मर्यादित असते. त्यामुळे पावसातील प्रत्येक खंड त्यांच्या आर्थिक गणितावर परिणाम करतो. शेतकऱ्यांना केवळ पीकविम्याच्या आश्वासनांवर न ठेवता, नुकसानभरपाईची पारदर्शक व्यवस्था आणि वेळेवर मदत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**पाण्याचे संकट आणि भूजलपातळी**

दुष्काळाचे सर्वाधिक तीव्र परिणाम पिण्याच्या पाण्यावर दिसून येतात. विहिरी, तलाव, लहान जलसाठे आणि बोअरवेल यांमधील पाण्याची पातळी घटल्यास ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी अधिक श्रम घ्यावे लागतात. पाणीपुरवठ्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आल्यास प्रशासनावरही मोठा ताण निर्माण होतो.

मात्र, केवळ नवीन विहिरी आणि बोअरवेल खोदून पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. भूजलाचा पुनर्भरण दर आणि पाण्याचा उपसा यामध्ये समतोल राखणे आवश्यक आहे.



पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे, नालाबांध, शेततळी, जलसंधारणाची कामे आणि स्थानिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन यांना प्राधान्य दिले पाहिजे.

पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे. त्यानंतर उपलब्ध साठ्यानुसार शेती आणि इतर गरजांसाठी पाण्याचे वितरण केले पाहिजे. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांनीही जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

**शेतकऱ्यांसाठी मदत नव्हे, तर सक्षम व्यवस्था हवी**

दुष्काळ जाहीर करणे, पंचनामे करणे आणि नुकसानभरपाई देणे या उपाययोजना महत्त्वाच्या असल्या, तरी त्या संकटानंतरच्या मदतीपुरत्या मर्यादित राहू नयेत. संकट येण्यापूर्वी त्याचा अंदाज घेऊन तयारी करणे अधिक महत्त्वाचे आहे.

हवामानाचा अचूक अंदाज शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, पिकांच्या अवस्थेनुसार कृषी सल्ला देणे, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे आणि सूक्ष्म सिंचनाचा विस्तार करणे आवश्यक आहे. ठिबक सिंचन व तुषार सिंचनासारख्या पद्धतींमुळे उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर करता येतो.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

### 'भीमा तुझ्या जन्मामुळे' चित्रपटाच्या दिग्दर्शकांसह

# कलाकारांचे संत्रानगरी मध्ये जल्लोषात स्वागत



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – संत्रानगरी येथे 'भीमा तुझ्या जन्मामुळे' या चित्रपटाच्या दिग्दर्शकांसह कलाकारांचे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले.

वरुड शहरातील पांढुर्णा चौकातील श्रीकृष्ण प्लाझा येथील हॉटेल क्रेझी डाईन इन येथे फुले-शाहू-आंबेडकर चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या वतीने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चित्रपटाच्या पोस्टरचे सामुहिक उदघाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवीण सावरकर होत तर स्वागताध्यक्ष म्हणुन सुधाकर हरले उपस्थित होते. या कार्यक्रमाला उदघाटक दुर्गा हरले तर प्रमुख अतिथी म्हणुन ॲड.संतोष खवले आणि प्रा. प्रवीण बोंद्रे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणुन 'भीमा तुझ्या जन्मामुळे' चित्रपटातील मुख्य अभिनेता श्रीवेश देशमुख, सहअभिनेत्री आर्या तभाने, सहअभिनेता सागर वाघमारे, कार्यकारी निर्माता वंश तांदळे आणि अभिनेता महेश वाघमारे यांनी उपस्थिती लावली. त्यांच्या आगमनाने कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाच्या प्रारंभी चित्रपटाचे दिग्दर्शक ॲड.संतोष खवले यांनी उपस्थितांना हा चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवावा तसेच समाजातील प्रत्येक घरापर्यंत त्याचा संदेश पोहोचविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |

# संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेसाठी खा.डॉ.हेमंत सवरा यांची निवड

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वसई** – भारत सरकारतर्फे १९ ते २३ ऑक्टोबर २०२६ दरम्यान न्यूयॉर्क येथे होणाऱ्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या ८१ व्या सत्रासाठी पाठवण्यात येणाऱ्या २० खासदारांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळात पालघर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.हेमंत विष्णू सवरा यांची विशेष निवड करण्यात आली आहे.



या शिष्टमंडळात निवडक आणि अभ्यासू खासदारांचा समावेश करण्यात आला असून, त्यात डॉ. हेमंत सवरा यांना स्थान मिळणे ही पालघर जिल्ह्यासाठी आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. या दौऱ्यात ते संयुक्त राष्ट्रसंघात होणाऱ्या विविध जागतिक विषयांवरील चर्चा, धोरणात्मक बैठका आणि परिसंवादांमध्ये भारताची भूमिका समर्थपणे मांडण्याची संधी मिळणार आहे.

डॉ.हेमंत सवरा यांच्या सामाजिक, राजकीय आणि वैद्यकीय क्षेत्रातील दांडग्या अनुभवाचा या आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी मंडळात भारताला नक्कीच फायदा होईल. या महत्त्वपूर्ण निवडीबद्दल खासदार डॉ.हेमंत सवरा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री जयशंकर यांचे आभार मानले आहेत.

# देवीच्या भजन-कीर्तनासह महाराजांच्या प्रवचनांचे आयोजन

### आरोग्य तपासणी, औषध वाटप आणि विविध स्पर्धांची मेजवानी

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील श्री सती माता (दुर्गा माता) शिश मंदीर संस्थानच्या वतीने आजपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ करण्यात आला.

आज सायंकाळच्या सुमारास राजेश जयस्वाल (जावई) व पदमा जयस्वाल यांचे हस्ते घटनास्थापना करण्यात आली. यावेळी आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर, नगराध्यक्ष ईश्वर सलामे, सहायक पोलिस निरिक्षक राहुल जाधव, नायब तहसिलदार पंकज चव्हाण, मुख्याधिकारी गजानन भोयर, जितेन शाह, श्याम दुर्गे, दंत तज्ञ डॉ.ओमप्रकाश मेंघाणी, डॉ.राहुल भुतडा, युवा व्यापारी संघाचे अध्यक्ष लोकेश अग्रवाल, नगरसेवक गोपी अढाऊ, राकेश माखीजा, शासकीय कंत्राटदार अरुण खेरडे, नरेश गोडबोले, माधव अकर्ते, दिनेश पाटील, अशोक श्रीराव तसेच इतर नगरसेवक व नगरसेविकास उपपस्थि होत्या.

नवरात्रौत्सव निमित्त धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवीची आराधना, भजन-कीर्तन, प्रवचन, महाआरती, आरोग्य तपासणी शिबिरे तसेच मेहंदी व रांगोळी स्पर्धांच्या माध्यमातून नागरिकांना विविध कार्यक्रमांची पर्वणी मिळणार आहे.



दररोज सायंकाळी देवीच्या पवित्र सांड्यांची सेवा आयोजित करण्यात आली असून दररोज दुपारी महिला भजनाचा कार्यक्रमही होणार आहे. पाट्यावरील दिव्यांच्या आकर्षक सजावटीसह गजानन-भवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होण्याची शक्यता आहे.

नवरात्रोत्सवा निमित्त विविध भागांतून येणाऱ्या महाराजांच्या प्रवचन व किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. १२ ऑक्टोबरपासून विविध महाराजांच्या धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात होणार असून पुढील दिवसांत भाविकांना आध्यात्मिक विचारांचे श्रवण करता येणार आहे. या कार्यक्रमांमुळे शहरातील धार्मिक वातावरण अधिक भक्तिमय होणार आहे.

२० ऑक्टोबर रोजी भव्य आरतीचा दुसरा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय बालक व गर्भवती महिलांसाठी आरोग्यविषयक उपक्रम, बालकांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन, दंतदोष तपासणी व मोफत औषध वाटप, तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहभागातून नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ मिळणार आहे.

१७ ऑक्टोबर रोजी मेहंदी स्पर्धा तर १८ ऑक्टोबर रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. धार्मिक कार्यक्रमासोबतच महिलांच्या कलागुणांना वाव देणारे हे उपक्रम उत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहेत.

२३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. धार्मिक श्रद्धा, सामाजिक बांधिलकी आणि लोकसहभाग यांचा सुंदर संगम साधणाऱ्या या उपक्रमांमुळे वरुड शहरात नवरात्रोत्सव उत्साहात साजरा होणार आहे.

उत्सवातील विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सती माता (दुर्गा माता) शिश मंदीर संस्थानच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# सर्वोच्च न्यायालयावर दबावाचा प्रयत्न : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढून मुख्य न्यायाधीशांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारावे आणि त्यांच्याशी चर्चा करावी, अशी अपेक्षा व्यक्त करणे संविधानाला अपेक्षित आहे का, असा सवाल करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी काँग्रेसकडून सर्वोच्च न्यायालयावर दबाव आणला जात असल्याचा आरोप केला.

काँग्रेसचे आंदोलन म्हणजे 'मॅन्युफॅक्चर्ड प्रोटेस्ट' असल्याची टीका करत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाला कोणत्याही परिस्थितीत हात लावू देणार नाही, असा इशाराही फडणवीस यांनी दिला.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीच्या खासदारांनी नवी दिल्लीत मोर्चा काढला. या पार्श्वभूमीवर नागपूरमध्ये प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधींशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. समाजमाध्यमांवर अपशब्द वापरणे अयोग्य 'सत्ताविभाजनाच्या तत्त्वानुसार न्यायपालिका स्वतंत्र असून, न्याय हवा असल्यास न्यायालयात याचिका दाखल करणे हाच घटनात्मक मार्ग आहे. सर्वोच्च न्यायालयानेही संबंधिताना न्यायालयात दाद मागण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे स्वतःला संविधानवादी म्हणविणाऱ्या राष्ट्रीयतावादी आणि उदारमतवादी विचारांच्या लोकांनी यावर भूमिका स्पष्ट करावी. न्यायालयाच्या भूमिकेनंतर सर न्यायाधीशांविरोधात समाजमाध्यमांवर अपशब्द वापरणे हा सर्वोच्च न्यायालयाला कमकुवत करण्याचा प्रयत्न आहे,' असा आरोपही फडणवीस यांनी केला.

देश आणीबाणीच्या दिशेने चाललाय का? -सुप्रिया सुळे दिल्ली पोलिसांच्या मनात नेमके काय चालले आहे, हेच कळत नाही. ही संपूर्ण परिस्थिती पाहता, देश आणीबाणीच्या दिशेने चालला आहे की काय, अशी भीती आणि भावना आज अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे. देशात पारदर्शक निवडणुका झाल्याच पाहिजेत.

ज्ञानेश कुमार यांनी नैतिकतेच्या आधारावर तत्काळ राजीनामा दिला पाहिजे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.

# न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे पालक सभा उत्साहात संपन्न

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे पालक सभा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व उत्कृष्ट रीतीने पार पडली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अशोक चौधरी होते. सभेला बहुसंख्य पालक उपस्थित होते. यावेळी शिक्षक व पालक यांच्यातील समन्वयातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक अशोक चौधरी यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालक व शिक्षक यांच्यातील समन्वयाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर राम पांडे यांनी पालकांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

पुढे परीक्षा प्रमुख मेघा बडे यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, अभ्यासातील सातत्य, परीक्षेची तयारी, नियमित उपस्थिती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला उपमुख्याध्यापक सुरेंद्र देशमुख, पर्यवेक्षक प्रमोद केने तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सविता ठाकरे तर आभार नंदिनी ठाकरे यांनी मानले. उपस्थित पालकांनी सभेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शाळेच्या विविध उपक्रमांना सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करणारी ही सभा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

# गणिताचे प्रसिद्ध प्राध्यापक माजी प्राचार्य रमेश झोटिंग यांचा अमृतमहोत्सव साजरा

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – माजी प्राचार्य, प्रसिद्ध गणिताचे प्रा.रमेश झोटिंग यांचा ७५ वा वाढदिवस मृतमहोत्सव म्हणुन साजरा करण्यात आला. रमेश झोटिंग म्हणजे गणिताचे प्रसिद्ध प्राध्यापक. गणित शिकवताना आकड्यांची बेरीज-वजाबाकी शिकवणारे अनेक शिक्षक असतात पण यांनी आयुष्यात मात्र माणसं जोडण्याचं गणित इतकं उत्तम साधलं की आज त्यांच्या भोवती आप्तेष्ट, मित्र मंडळ आणि विद्यार्थ्यांचा मोठा परिवार उभा आहे.

त्यांचा मुलगा व सुन डॉक्टर आहे, मुलीही उच्च शिक्षण घेऊन संसारात सुखी आहे. मुलांच्या यशामागे आई-वडिलांचे संस्कार, त्याग आणि कष्ट असतात आणि झोटिंग कुटूंबाच्या या यशामागे रमेश यांच्यासोबत त्यांच्या अर्धांगिनी छाया यांचाही सिंहाचा वाटा आहे. या प्रसंगी देविदास कोहळे, माजी प्राचार्य शशिकांत बेलसरे, विकास ठाकरे, जायंटस गृप ऑफ वरुडचे अध्यक्ष विजय गुल्हाणे, विष्णुपंत रडके आदींनी रमेश झोटिंग यांच्या जिवन व कार्यावर प्रकाश टाकला.

### गोळा फेक स्पर्धेत जनता गर्ल्स हायस्कूलची

# आस्था विटाळकर हिची विभागीय स्तरावर झेप

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**शेंदुरजनाघाट** – अमरावती येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय आंतरशालेय गोळा फेक स्पर्धेत जनता गर्ल्स हायस्कूल येथील विद्यार्थिनींनी आस्था मनिष विटाळकर हिने उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

तिच्या या उल्लेखनीय कामगिरीची विभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली असून तिच्या यशामुळे शाळेचे नाव उज्ज्वल झाले आहे. या यशासाठी क्रीडा शिक्षक अमोल काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले असुन विद्यार्थिनीच्या या यशाबद्दल मुख्याध्यापिका माया हिवसे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच व्यवस्थापन मंडळाने तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. आस्थाच्या या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा संशय; पतीला अटक, चौघांवर गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पोलादपूर** – तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथील रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मुरलीधर दरेकर यांची सून गार्गी गणेश दरेकर हिचा गळफास लावून मृत्यू झाल्याप्रकरणी तिला आत्महत्या करण्यात प्रवृत्त केल्याचा पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी तिचा पती गणेश मुरलीधर दरेकर यांच्यासह अन्य चार जणांवर गुन्हा दाखल झाला असून पतीला पोलिसांनी अटक करुन महाड न्यायालयात हजर केले असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

राजिपचे माजी सदस्य मुरलीधर दरेकर यांच्या घरी मुलगा घराबाहेर गेला असताना सुन गार्गी गणेश दरेकर हिने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून गळफास लावून घेतल्याने तिचा मृत्यू झाला असल्याचे दिसून आले. यावेळी विवाहितेचा भाऊ प्रथमेश दळवी याने बहिणीचा मृतदेह पाहून पोलादपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.




याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या फिर्यादीनुसार मृत गार्गीच्या मृत्यूप्रकरणी आरोपी पती गणेश मुरलीधर दरेकर, मुरलीधर दरेकर, मनीषा दरेकर, मुन्नी पार्टे, श्रीकांत पार्टे यांनी शारीरिक, मानसिक तसेच वेळोवेळी पैशाची मागणी करून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. या गुन्ह्यातील आरोपी गणेश मुरलीधर दरेकर नुकतीच अटक

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वरुड, श्री.व्ही.व्ही.राजुरकर दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९१३/२०२६ ने.ता.१८/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती श्रीमती सुधा शिरीष साबळे, वय अं.४७ वर्ष, धंदा-गृहिणी, २) कु.सृष्टी शिरीष साबळे, वय अं.२४ वर्ष, धंदा-शिक्षण, ३) श्रीमती प्रभाबताई वासुदेवराव साबळे, वय अं.८० वर्ष, धंदा-गृहिणी, क्र.१ते ३ रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत वासुदेव साबळे, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१८/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड, (इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८८४/२०२६ ने.ता.२१/११/२०२६**

अर्जदार :-

१) श्रीमती नर्मदा विष्णु दंडाळे, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम
२) योगेश विष्णु दंडाळे, वय अं.३८ वर्ष, धंदा-शेती
क्र.१ व २ रा.अमडापूर, ता.वरुड, जि.अमरावती
३) सौ.सिमा गुणवंतराव ठाकरे, वय अं.३५ वर्ष, धंदा-घरकाम
रा.पिंपळखुटा (लहान), ता.मोर्शी, जि.अमरावती
४) सौ.पुष्पा राजेंद्र ठाकरे, वय अं.३२ वर्ष, धंदा-घरकाम
रा.बघोडा, ता.मुलताई, जि.बैतुल

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत विष्णु संतोषराव दंडाळे, रा.अमडापुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड, (इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२१/२०२६ ने.ता.२१/१०/२०२६**

**अर्जदार :-**

श्रीकृष्ण बळीरामजी नागले
वय अं.५४ वर्ष, धंदा-शेती
रा.काटी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत बळीराम विश्राम नागले व मयत जयवंताबाई बळीराम नागले, रा.काटी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड, (इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२३/२०२६ ने.ता.०६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती बनुबाई दशरथजी बासंदे, वय अं.६१ वर्ष, धंदा-घरकाम, २) देविदास दशरथ बासंदे, वय अं.४३ वर्ष, धंदा-शेती, ३) विनायक दशरथ बासंदे, वय अं.४१ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ ते ३ रा.वंडली, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दशरथ बळीरामती बासंदे, रा.वंडली, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

# थकीत देयकांवरून कंत्राटदारांचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्य सरकारच्या विविध विभागांतील विकासकामे मार्गी लावल्यानंतर देयकाची रक्कम मिळवण्यासाठी कंत्राटदारांना मंत्रालयाच्या पायऱ्या झिझवाव्या लागत आहेत. राज्य सरकारच्या विविध विभागांतील विकासकामे मार्गी लावल्यानंतर देयकाची रक्कम मिळवण्यासाठी कंत्राटदारांना मंत्रालयाच्या पायऱ्या झिझवाव्या लागत आहेत. तरीही देयकाची रक्कम मिळत नसल्याने काही कंत्राटदारांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले आहे. मात्र, राज्य सरकारकडून कंत्राटदारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जाते. राज्य सरकारच्या हुकूमशाहीविरोधात कंत्राटदारांमध्ये रोष पसरला असून येत्या १९ ऑक्टोबरपासून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सीमोल्लंघन करण्याचा इशारा देण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले.



**जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर आंदोलन**

राज्य सरकारच्या हुकूमशाही, दडपशाही, दादागिरी धोरणांविरोधात राज्यातील सर्व कंत्राटदारांनी सोमवार १९ ऑक्टोबर रोजी सकाळी १२ वाजता राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचे सीमोल्लंघन होणार आहे, असा गर्भित इशारा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने दिला आहे.

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९२२/२०२६ ने.ता.१९/११/२०२६**

**अर्जदार :-** १) मुन्नी नवाब जाकीरखान नवाब, वय अं.६५ वर्ष, धंदा-गृहिणी, २) नवाब जुनेद खान नवाब जहागीर खान, वय अं.३५ वर्ष, धंदा-मजुरी, क्र.१ व २ रा.वार्ड क्र.१, आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती, ३) तबस्सुम परवीन सैय्यद रियाज अली, वय अं.४३ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.शाही मस्जिद जवळ, महाल, नागपूर, ४) नाजीया परवीन यूनूस सैय्यद, वय अं.३९ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.रोषणखेडा, ता.वरुड, ५) शैला इरफान शेख, वय अं.३७ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.मोवाड, ता.नरखेड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत जहागीर खान अजीज नवाब, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड, (इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८७९/२०२६ ने.ता.०५/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) अर्चना अनिल जावळे, वय अं.७४ वर्ष, धंदा-घरकाम
२) अनुराग अनिल जावळे, वय अं.३९ वर्ष, धंदा-नोकरी
क्र.१ व २ रा.मुलताई रोड वरुड, ता.वरुड,
३) मिनल प्रविण भोज, वय अं.४७ वर्ष, धंदा-घरकाम
रा.कल्याण वेस्ट, ठाणे, ता.कल्याण, जि.ठाणे

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत अनिल रामचंद्र जावळे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०५/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०७/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (प्रभारी), (कनिष्ठ स्तर) वरुड, यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८८७/२०२६ ने.ता.१६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) रविंद्र अशोक कुकडे, वय अं.३१ वर्ष, धंदा-शेती
२) कु.पुजा अशोक कुकडे, वय अं.२४ वर्ष, धंदा-गृहीणी
दोघेही रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत अशोक जंगलु कुकडे व मयत लिला अशोकराव कुकडे, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश (प्रभारी), (कनिष्ठ.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९१२/२०२६ ने.ता.१७/११/२०२६**

**अर्जदार :-** १) सौ.सीता मोतिराम घोरसे, वय अं.३७ वर्ष, धंदा-घरकाम, रा.वार्ड नं.१ मु.बेसखेडा, पो.एकदरा, २) सौ.मीना शरदराव महाकाळकर, वय अं.६६ वर्ष, धंदा-डॉक्टर, रा.वर्धा रोड, नागपूर, ३) सौ.पूजा गोविंद बोधे, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम, रा.वडमुखवाडी, चरहोली खुर्द, ता.खेड, ४) श्री.भारत आनंदराव बारमासे, वय अं.६१ वर्ष, धंदा-नोकरी, रा.जयंतीनगर जवळ-३, वैद्य नगर, जि.नागपूर ४४०००५, ५) श्री.संजीव आनंदराव बारमासे, वय अं.५९ वर्ष, धंदा-व्यावसाय, रा.कांचनगंगा, मोंढा, नागपूर, ६) श्री.अनिल आनंदराव बारमासे, वय अं.५५ वर्ष, धंदा-नोकरी, रा.ब्रम्हमांड, ठाणे, जि.ठाणे, क्लस्टर ३, विंग ए, कांचनगंगा, मोंढा, नागपूर, ७) श्री.राजेंद्र आनंदराव बारमासे, वय अं.५१ वर्ष, धंदा-मजुरी, ८) श्री.जितेंद्र आनंदराव बारमासे, वय अं.५० वर्ष, धंदा-मजुरी, ९) श्रीमती कीर्ती शशांक बारमासे, वय अं.४० वर्ष, धंदा-गृहिणी, ९-अ) सोहम शशांक बारमासे, वय अं.१९ वर्ष, धंदा-शिक्षण, क्र.७,८,९ आणि ९-अ रा.बेनोडा

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत आनंदराव पांडुरंगजी बारमासे, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०९/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# जंतर-मंतरवर प्रवेश करताच दिल्ली पोलिसांची कारवाई

## सौरव दास, आशुतोष रांकांसह अजिंक्य शिंदे ताब्यात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – दिल्लीतील जंतर-मंतरला अधिकृत आंदोलनस्थळांच्या यादीतून वगळण्यात आल्यानंतरही तेथे आंदोलन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या नेत्यांना दिल्ली पोलिसांनी मंगळवारी (१३ ऑक्टोबर) ताब्यात घेतले. पक्षाचे मुख्य प्रवक्ते सौरव दास आणि राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांच्यासह राष्ट्रीय संघटन प्रभारी अजिंक्य शिंदे यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रध्वज हातात घेऊन जंतर-मंतर परिसरात प्रवेश केला होता. या घटनेनंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे.

जंतर-मंतर आम्ही पुन्हा ताब्यात घेतले; सौरव दास यांची पोस्ट जंतर-मंतर परिसरात प्रवेश केल्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा दावा सौरव दास यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून केला. 'जंतर-मंतर आम्ही पुन्हा ताब्यात घेतले आहे. आम्ही जंतर-मंतरमध्ये प्रवेश केला आणि आता पोलीस आम्हाला ताब्यात घेत आहेत. मात्र, आपल्या तरुण पिढीसाठी हा एक संदेश आहे. आपण हे करू शकतो!' अशा शब्दांत त्यांनी प्रतिक्रिया दिली. 'प्रतिकाराचा आवाज अधिकृत यादीतून वगळता येणार नाही' सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनीही'एक्स'वरील पोस्टमधून या कारवाईवर टीका केली.

# सिंधुदुर्गाची भूजलपातळी खालावली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सिंधुदुर्ग** – कोकणातील सर्वाधिक पावसाच्या जिल्ह्यांपैकी एक असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात यंदा पावसाने अखेरच्या टप्प्यात दडी मारल्याने शेतीचे पूर्ण नुकसान झालेच आहे, शिवाय पाणीटंचाईचे संकट घडत होण्याची चिन्हे दिसत आहेत. जिल्ह्यातील भूजलपातळीतील घसरणीच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये पाण्याची स्थिती सामान्य असली, तरी काही ठिकाणी भूजलपातळीतील घट मध्यम, तर मालवणमध्ये अतिगंभीर स्वरूपाची असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरून स्पष्ट होते. त्यामुळे आगामी काळातील पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वातावरणातील बदल आणि सद्यस्थिती पाहता भूजल पातळीतील घसरण कायम राहिल्यास विहिरी, विंधण विहिरी आणि अन्य स्थानिक जलस्रोतांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहू शकते.

# कारवाईआधी राज्य सरकारशी चर्चा करा! झोपड्यांबाबत खासदारांची विभागीय बैठक : रेल्वेला सूचना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – न्यायालयाच्या आदेशानंतर रेल्वे हद्दीतील झोपडपट्ट्यांना नोटीस बजावत कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे. तरी रेल्वे हद्दीतील पात्र झोपडीधारकांचा कुठलाही विचार केला जात नाही. त्यामुळे रेल्वे हद्दीतील झोपड्यांवर कारवाई करण्याआधी राज्य सरकारशी चर्चा करण्यात यावी, अशी सूचना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे खासदार रवींद्र वायकर यांनी केली आहे.

मुंबई उपनगरीय लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्या विविध तांत्रिक कारणांमुळे एकाच ठिकाणी तासनब तास उभ्या राहिल्याने प्रवासी हैराण होतात. गाडी का थांबली गाडी कधी सुरू होणार याची माहिती मिळत नाही. या माहितीच्या अभावामुळे हताश झालेले प्रवासी थेट रेल्वे रुळांवर उतरून चालण्यास सुरुवात करतात, ज्यामुळे मोठ्या अपघातांचा धोका निर्माण होतो. हे अपघात टाळण्यासाठी गाड्यांमधील मोटरमन किंवा गार्ड यांनी उद्घोषणेच्या माध्यमातून लोकल डब्यातील प्रवाशांना विलंबाचे नेमके कारण सांगावे, अशी आग्रही मागणी खासदार रवींद्र वायकर यांनी पश्चिम रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. पश्चिम रेल्वे प्रशासनाची विभागीय खासदारांबरोबर बैठक पार पडली. यावेळी खासदार मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रवींद्र वायकर यांनी पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर काही प्रश्न उपस्थित केले व सूचना मांडल्या.

# एलॉन मस्क यांच्या टेस्लाला दिलेल्या सवलतींचा आढावा घेणार - परिवहनमंत्री सरनाईक

## पंतप्रधान मोदींबद्दलच्या ट्वीटमुळे भावना दुखावल्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'प्राईम मिनिस्टर अंबानी' असा उल्लेख करणाऱ्या एलॉन मस्क यांचा निषेध नोंदवत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी टेस्लाला दिलेल्या सवलतींचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. देशाच्या नेतृत्वाचा सन्मान व्यावसायिक हितापेक्षा महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट करताना, महाराष्ट्राचे आणि देशाचे हित लक्षात घेऊन 'टेस्ला'ला दिलेल्या सवलतींचा पुनर्विचार केला जाईल, असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, २०२५ मध्ये भारतात विकल्या गेलेल्या टेस्लाच्या एकूण वाहनांपैकी सुमारे ३३ टक्के वाटा एकट्या महाराष्ट्राचा होता.

भारताच्या सर्वोच्च नेतृत्वाचा आणि लोकशाही संस्थांचा सन्मान राखणे हे कोणत्याही व्यावसायिक हितापेक्षा महत्त्वाचे आहे, अशी भूमिका राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मांडली आहे. टेस्लाचे संस्थापक एलॉन मस्क यांच्या सोशल मीडिया वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर सरनाईक यांनी ही भूमिका मांडताना, आयात केलेल्या इलेक्ट्रिक वाहनांना लागू असलेल्या शून्य टक्के रस्ते करसवलतीसह संबंधित धोरणांचा नियमानुसार आढावा घेण्याचे संकेत दिले. या सवलती तातडीने रद्द करण्याची घोषणा त्यांनी केलेली नसली, तरी महाराष्ट्राचे आर्थिक हित आणि देशाचे व्यापक हित लक्षात घेऊन त्यांचा पुनर्विचार केला जाऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, टेस्लाच्या भारतातील विक्रीत महाराष्ट्राचा मोठा वाटा राहिला असून, २०२५ मध्ये देशात विकल्या गेलेल्या २२६ वाहनांपैकी १४० वाहने महाराष्ट्रातील होती.

मस्क यांनी ९ ऑक्टोबर रोजीच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी 'प्राईम मिनिस्टर अंबानी' असा उल्लेख केला. त्यावर आक्षेप घेत सरनाईक यांनी अशी टिप्पणी खेदजनक असल्याचे म्हटले. लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या देशाच्या नेतृत्वाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी वक्तव्ये स्वीकारली जाणार नाहीत, अशी भूमिका त्यांनी मांडली. आंतरराष्ट्रीय कंपन्यांना भारतात आणि महाराष्ट्रात व्यवसायाच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत; मात्र या संधींचा आधार परस्पर सन्मान, विश्वास आणि जबाबदारी हा असला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

सरनाईक यांनी दिलेल्या माहितीवारीनुसार, २०२५ मध्ये भारतात टेस्लाच्या २२६ वाहनांची विक्री झाली.

# सत्तेचा खरा अर्थ काय ? पंतप्रधान मोदींनी ब्लूमबर्ग फोरममध्ये मांडले स्पष्ट विचार!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – 'सत्ता कोणाकडे आहे किंवा ती कोणाजवळ एकवटली आहे, यापेक्षा त्या सत्तेचा वापर सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी कसा केला जातो, हा खरा आणि महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे आपले अंतिम ध्येय हे केवळ नियंत्रण ठेवण्याचे नसून, 'लोकांना सक्षम करणारी सत्ता' निर्माण करण्याचे असले पाहिजे,' असा मोलाचा आणि दूरदर्शी विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला आहे. ते नवी दिल्लीत पार पडलेल्या 'ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरम' मध्ये जगभरातील दिग्गज नेत्यांना संबोधित करत होते.

तंत्रज्ञान आणि ज्ञानाचा फायदा कोट्यवधी जनतेपर्यंत पोहोचावा सध्याच्या बदलत्या युगात तंत्रज्ञान, डेटा, ज्ञान आणि नवसंशोधन हीच सत्तेची नवी आणि प्रभावी साधने बनली आहेत, यावर पंतप्रधानांनी भर दिला. ते म्हणाले की, ही साधनसंपत्ती किंवा ज्ञान केवळ काही मोजक्या लोकांपुरते किंवा उच्चभ्रू वर्गापुरते मर्यादित राहू नये. त्याचा खरा उपयोग कोट्यवधी सर्वसामान्य नागरिकांना प्रगतीच्या नवीन संधी मिळवून देण्यासाठी झाला पाहिजे. भारतात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेचे पंतप्रधान मोदींनी मनापासून स्वागत केले. याविषयी बोलताना ते म्हणाले, 'दरवर्षी आपण या फोरममध्ये अर्थव्यवस्था, ऊर्जा आणि इतर जागतिक मुद्यांवर चर्चा करतो. मात्र, यंदा ही महत्त्वाची परिषद पहिल्यांदाच आपल्या भारतात होत आहे.




